# नेहरू काका



म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा. क्र. ५४६

BVBK-0400546

ज्योत्स्ना प्रकाशन



बाल वाङ्मय विभाग
दिनांक ........
क्र. ........

# नेहरूकाका

: लेखक :
भा. म. वैद्य

BVBK-0400546

ज्योत्स्ना प्रकाशन

मूल्य एक रुपया



नेहरूकाका व वसंतराव नाईक

प्रथमावृत्ती : २७ जुलै १९६४
द्वितीयावृत्ती : १४ नोव्हेंबर १९६५
तृतीयावृत्ती : १ ऑक्टोबर १९६९
चौथी आवृत्ती : १७ ऑक्टोबर १९७२
पांचवी आवृत्ती : नवमहाराष्ट्र दिन, १ मे १९७६

© ज्योत्स्ना प्रकाशन

मुद्रक : एच. बी. धाणेकर, न्यू एज प्रिंटींग प्रेस, ८५, पी. बाळू मार्ग, मुंबई २५.
प्रकाशक : लक्ष्मण गोपाळ परांजपे, ३० सी, खोताची वाडी, गिरगाव, मुंबई ४.



श्री. नेहरूकाका

छोटा जवाहर एकदा आपल्या वडिलांच्या ऑफिसात गेला.

ऑफिसात वडील नव्हते.

तो वडिलांच्या टेबलापाशी बसला. वडिलांच्या टेबलावर दोन सुंदर फाऊंटन पेने होती.

ती पेने छोट्या जवाहरला फारच आवडली. त्यातले एखादे पेन आपल्याला मिळाले तर, काय मजा होईल असे त्याला वाटले.

तो त्या पेनांकडे बराच वेळ पाहत राहिला, मग त्याने मनाशी म्हटले, बाबांना एवढी दोन पेने कशाला ? एक पेन असले तरी हवे तेवढे लिहिता येईल त्यांना.

त्यातले एक पेन घेतले तर काय हरकत आहे ?

शेवटी त्यातले एक पेन आपण घ्यायचे असे ठरवून त्याने एक पेन घेतले व वडील येण्यापूर्वीच तो घरी निघून गेला.

आपले कोर्टातले काम आटोपून वडील ऑफिसात आले.



पिता-पुत्र

पाहातात तो टेबलावरचे एक पेन नाहीसे झालेले. तेथे काम करणाऱ्या कारकुनाकडे चौकशी केली, पण काही पत्ता लागला नाही. मात्र तेथे छोटा जवाहर येऊन गेला एवढे त्यांना कळले. घरी आल्यावर वडिलांनी छोट्या जवाहरला त्याबद्दल विचारले.

शेवटी ते पेन जवाहरने आपल्या नकळत आणल्याचे त्यांना कळले.

त्यांना जवाहरचा राग आला. न विचारता फाउंटन उचलल्याबद्दल छोट्या जवाहरला छड्या खाव्या लागल्या.

खरे पाहिले तर जवाहर हा त्यांचा एकुलता एक आवडता मुलगा होता, पण ते कडक शिस्तीने वागणारे होते. गैरशिस्त वागणे त्यांना मुळीच आवडत नसे; म्हणून त्यांनी जवाहरला शिक्षा केली.

मुलांनो, हा छोटा जवाहर म्हणजेच स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू किंवा आपले आवडते नेहरूकाका होत.

त्यांच्यासंबधी थोडी माहिती मी तुम्हाला सांगणार आहे. ऐका हं!



घोड्यावरील रपेट

काकांच्या आयुष्यातील एक आनंदाचा क्षण

## थोर घराणे

पंडित जवाहरलाल नेहरूंचे मूळ घराणे काश्मीरमधले. त्यांचे वाडवडील काश्मीरमध्ये राहात असत. ते काश्मिरी ब्राह्मण होते.

फार फार पूर्वी दिल्लीच्या एका बादशहाने ह्या पंडित घराण्याची कीर्ती ऐकून त्यांना आपल्या दरबारात बोलावून त्यांचा मोठा सन्मान केला.

तेव्हापासून ह्या घराण्याचा मूळ पुरुष उत्तर प्रदेशात स्थायिक झाला.

ह्या पंडित घराण्यातच इ. स. १८८९ सालच्या १४ नोव्हेंबर रोजी अलाहाबाद येथे जवाहरलाल यांचा जन्म झाला.

जवाहरलालजींच्या वडिलांचे नाव मोतीलाल व त्यांच्या आईचे नाव स्वरूपराणी असे होते.

पंडित मोतीलाल नेहरू हे फार प्रसिद्ध वकील होते.

त्यांनी वकिली करून खूप संपत्ती मिळविली होती.

आपल्या जवाहरला चांगले शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी लहानपणापासून त्याच्या शिक्षणाची स्वतंत्र सोय केली होती. लहानपणापासून त्याला शिक-ण्यासाठी युरोपियन शिक्षक नेमले होते.

दोन थोर देशभक्त



नेताजी सुभाषचंद्र बोस व श्री. नेहरू

बालपणातले शिक्षण घरीच झाल्यामुळे जवाहरलालजींना आपल्या बरोबरीच्या मुलांची संगत कधी मिळालीच नाही.

फक्त त्यांच्या वाढदिवसाच्या वेळी अनेक लहानमोठी मंडळी त्यांच्याकडे जमत असत.

त्या दिवशी खूप खूप गंमत व्हायची.

तो दिवस मोठ्या मजेत जायचा. त्यामुळे असे वाढदिवस एकसारखे झाले तर काय मौज होईल असे छोट्या जवाहरला वाटायचे.

असे वाढदिवस लवकर लवकर करावे असा हट्टही कधीकधी जवाहर-लालजींनी धरला होता.

ते दहा वर्षांचे झाले तेव्हा ते खूप मोठ्या घरात राहावयास गेले. हे नवे घर जवाहरलालजींना फार आवडले.

त्या घराचे नाव होते आनंद भवन.

आनंद भवनात आल्यावर त्यांना

एक बहीण झाली. आता आपणास लहानग्या बहिणीबरोबर खेळायला मिळणार म्हणून जवाहरलालना खूप आनंद झाला.

पण एकंदरीत बालपणी बरोबरीच्या मुलांत फारसे मिसळावयास न मिळाल्यामुळे त्यांचा स्वभाव थोडासा एकलकोंडा बनला होता.

जवाहरलाल पंधरा वर्षांचे होताच त्यांना पुढील शिक्षणासाठी इंग्लंडमध्ये पाठविले.

तेथील हॅरो ह्या ठिकाणच्या प्रसिद्ध शाळेत त्यांना घातले. तेथे मात्र त्यांना बरोबरीचे खूप सोबती मिळाले.


त्यांना बरोबरीच्या मुलांत मिसळता येऊ लागल्यामुळे त्यांचा एकलकोंडा स्वभाव हळू हळू बदलला.

लहानपणापासूनच जवाहरलालना वाचनाची आवड होती.

हॅरो येथे असताना त्यांनी खूप पुस्तके वाचली. त्यामुळे त्यांच्या ज्ञानात खूपच भर पडली.

हॅरो येथील शाळेतले शिक्षण पूर्ण झाल्यावर ते केंब्रिज येथील विद्यापीठात दाखल झाले.

तेथे अभ्यास करून त्यांनी केंब्रिज विद्यापीठाची बी. ए. ही पदवी मिळविली; व पुढे वकिलीच्या धंद्यासाठी बॅरिस्टरीची परीक्षा देऊन ते भारतात परत आले.



प्रतापगडावरील शिवरायांचा पुतळा नेहरूंनी बसविला.

स्वातंत्र्याची महती

सतत सहा-सात वर्षे इंग्लंडसारख्या स्वतंत्र देशात राहिल्यामुळे तेथील लोक स्वातंत्र्यामुळे कसे सुखी आहेत ह्याची त्यांना नीट कल्पना आली.

आपला देशही असाच स्वतंत्र झाला पाहिजे असे त्यांना वाटू लागले.

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळण्यासाठी आपल्याला काय करता येईल ह्या गोष्टीचा ते वारंवार विचार करू लागले.

बॅरिस्टर होऊन येथे परत आल्यावर जवाहर ह्यांनी आपल्याप्रमाणेच उत्तम वकील व्हावे असे त्यांच्या वडिलांना वाटत होते.

वडिलांच्या इच्छेप्रमाणे ते त्यांच्या कामात मदतही करू लागले.

ह्याच सुमारास कमला नावाच्या सुंदर मुलीशी त्यांचे लग्न झाले.

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे नि त्यासाठी आपण काही तरी केले पाहिजे असे एकसारखे वाटत असल्यामुळे वकिलीच्या कामात त्यांचे मन रमेना.

गुरु-शिष्य



युगायुगाने जन्म घेणारे महापुरुष

## देशासाठी चळवळ

भारत स्वतंत्र होण्यासाठी काय करावे ? अशा प्रकारचे विचार त्यांच्या मनान येत असतानाच सन १९२१ साली महात्मा गांधींची व त्यांची गाठ पडली.

त्यांना महात्मा गांधींची मते पटली. काकांनी बापूजींना गुरु मानले.

लगेच त्यांनी आपल्या भारताला स्वातंत्र्य मिळावे म्हणून प्रयत्न करावयास सुरुवात केली.

त्यांची पत्नी कमला ही देखील त्यांना त्यांच्या कामात मदत करू लागली.

हे सगळे इंग्रजांना आवडले नाही, त्यामुळे नेहरूंना पुष्कळ वेळा तुरुंगात जावे लागले.

पण जवाहरलाल डगमगले नाहीत. त्यांनी देशासाठी खूप हाल सोसले. त्यांच्या पत्नीला देखील खूप हाल सोसावे लागले.

खरे पाहिले तर जवाहरलाल खूप श्रीमंत होते.

त्यांना कष्ट करण्याची मुळीच



देशासाठी कारावास भोगला

जरूरी नव्हती, पण त्यांना काळजी होती आपल्या देशबांधवांची.

कितीही कष्ट सोसावे लागले तरी ते आपल्या देशासाठी आनंदाने सोसायचे असे त्यांनी पक्के ठरविले व त्यांनी स्वातंत्र्यासाठी प्रयत्न सुरू ठेवले.

जवाहरलालनी अनेक देशांत प्रवास केला. तेथील लोकांबद्दल त्यांनी खूप माहिती मिळविली.

तुरुंगात असतानाच त्यांनी काही ग्रंथ लिहिले.

त्यांनी आपले चरित्र देखील लिहिले आहे. ही त्यांची पुस्तके इंग्रजी भाषेत लिहिलेली आहेत.

लहानपणापासूनच ते इंग्रजीमधून शिकले. पुढे तर ते इंग्लंडमध्येच शिकले. मात्र हिंदी ही त्यांची मातृभाषा होय.

त्यांच्या पुस्तकांची मराठी भाषेत भाषांतरे झाली आहेत.

ह्याशिवाय तुरुंगात असताना त्यांनी आपली मुलगी इंदिरा हिला अनेक पत्रे लिहिली.

त्यात जगासंबंधी खूपच माहिती आहे. ती पत्रे देखील पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाली आहेत.




मुलांनो, तुम्ही मोठे झालात की, त्यांची पुस्तके नि ती पत्रे अवश्य वाचा. त्यामुळे तुमच्या ज्ञानात खूपच भर पडेल.

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून खटपट करण्यासाठी देशातल्या लोकांनी एक संस्था स्थापन केली.

तिचे नाव कॉंग्रेस किंवा राष्ट्रीय सभा असे आहे.

ह्या संस्थेचे जवाहरलाल अनेक वेळा अध्यक्ष झाले. लोकांचे जवाहरलालजींवर फार प्रेम !

आपला सगळा वेळ ते देशासाठी खर्च करीत असत. पुढे त्यांच्या वडिलांनी देखील देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून प्रयत्न सुरू केले.

त्यांनाही इंग्रज सरकारने कैदेत ठेवले होते.

अशा प्रकारे देशासाठी अनेक प्रकारे कष्ट सोशीत असतानाच त्यांच्यावर एकामागून एक दुःखाचे प्रसंग आले.

त्यांचे वडील मोतीलाल १९३१ साली निधन पावले.



श्री. वसंतराव नाईक
श्री. बाळासाहेब देसाई
यांचेसह

नेहरूकाका

त्या दुःखाचा भार कमी होतो तोच १९३६ साली त्यांची पत्नी कमला हिचा अंत झाला.

कमला नेहरूंची आपणा सर्वांना नेहमी आठवण राहावी म्हणून मुंबईच्या नगरपालिकेने एक सुंदर बाग तयार करून तिला "कमला नेहरू पार्क" असे नाव दिले आहे.

☆ □ ☆ □ ☆ □ ☆ □ ☆ □ ☆ □ ☆ □ ☆ □ ☆ □ ☆ □

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रन्थालय
वाङ्मय
क्र. ५४८

पत्नीच्या मृत्यूमुळे नेहरूकाकांना फारच दुःख झाले.

पुढे लवकरच म्हणजे १९३९ साली त्यांच्या मातुश्री स्वरूपराणी ह्यापण निवर्तल्या. हे सर्व दुःखाचे प्रसंग सहन करीत असता धीर खचू न देता त्यांनी आपले देशसेवेचे काम चालूच ठेविले.

शेवटी सगळ्याच देशसेवकांच्या प्रयत्नामुळे १९४६ साली भारतात एक राष्ट्रीय सरकार स्थापन झाले. त्यामध्ये नेहरूकाकांना उपाध्यक्ष नेमले होते.

पुढे १९४७ मध्ये १५ ऑगस्ट रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले व आपले नेहरूकाका भारताचे मुख्य प्रधान झाले.



पंडित नेहरू, राष्ट्रपती राधाकृष्णन् व कै. डॉ. राजेंद्रप्रसाद

लोकांनी आपसात एकमेकांशी भांडू नये, एकमेकांच्या अडचणीच्या वेळी एकमेकांना मदत करावी.

एकमेकांना त्रास होणार नाही अशा रीतीने सर्वांनी वागावे, असे नेहरू-काकांना वाटत होते. म्हणून त्यांनी भांडणे मिटविण्याचे फार प्रयत्न केले.

जगातील सगळ्या देशांत शांतता राहावी, भांडणे होऊ नयेत म्हणून नेहरूकाकांनी फार प्रयत्न केले.

त्यांनी अनेक देशांना भेटी देऊन त्यांची मैत्री संपादन केली.

कित्येक देशांनी आपण होऊन नेहरू-काकांना आपल्या देशात बोलाविले.

असे केल्यामुळे नेहरूकाकांची सर्व जगात प्रसिद्धी झाली. सगळ्यांनाच नेहरूकाकांचे म्हणणे पटले व त्यांना आपसातली भांडणे थांबविली.

आपल्या इतर मदतनिसांच्या मदतीने त्यांनी आपल्या देशबांधवांची स्थिती सुधारावी म्हणूनही फार प्रयत्न केले.

ते दिवसभर फार काम करीत असत. दिवसाच्या चोवीस तासांपैकी ते फक्त चार तास झोप घेत.



केनेडी व नेहरूकाका

सगळ्या लोकांनीही असेच काम करीत राहिले म्हणजे देशाची भरभराट लवकर होईल असे त्यांना वाटे.

तसे वागण्याबद्दल ते लोकांना नेहमी सांगत. ते म्हणत,

" आराम हराम है ! "

नेहरूकाकांना काम करणारी माणसे फार आवडत.

काही तरी सबबी सांगून कामाची टाळाटाळ करणाऱ्या माणसाचा त्यांना राग येई. ते कामाला बसत त्याजागी मोठ्या अक्षरात लिहून ठेवले होते की,


" मला सबबी नकोत. काम हवे."

शेवटपर्यंत देशासाठी असेच खूप काम करीत राहायचे असे त्यांनी ठरविले होते.

नेहरूकाकांनी आपले सगळे आयुष्यच देशाला दिले. ते म्हणत,

" मी देशाचा आहे. येथे माझे असे काही नाही." त्यांनी आनंदभुवन काँग्रेसला देऊन टाकले होते.

नेहरूकाकांना मुले नि फुले यांची फार आवड. तसेच त्यांना बाग तयार करण्याची फार आवड. त्यांच्या



बालोद्यानात नेहरूकाका

फुलामुलांची काकांना फार आवड

घराभोवती असलेल्या बागेची व्यवस्था पाहण्यात ते आपला रोजचा थोडा वेळ खर्च करीत.

फुलांच्या आवडीची खूण म्हणून ते आपल्या कोटाच्या बटणात नेहमी एक सुंदर लाल गुलाबाचे फूल लावून ठेवीत असत.

मुले तर त्यांची फारच आवडती. ते कोठेही गेले की, आरंभी तेथील मुलांमध्ये मिसळायचे.

कोणाला फुले दे, कोणाच्या पाठीवरून हात फिरव, कोणाचा गालगुच्चा घे, असे करण्यात ते मुलांमध्ये अगदी रंगून जात.

मुलांत असले म्हणजे नेहरूकाका आपला मोठेपणा विसरून जायचे. मुलांबरोबर खेळावे असे त्यांना वाटे.

आपले दोघे नातू राजीव व संजीव ह्यांच्याबरोबर खेळताना तर कधी कधी स्वतःच आपण घोडा होऊन त्यांना पाठीवरून फिरवीत.



नातवंडांच्या सहवासातील काही गोड क्षण

म्हणूनच मुलांनादेखील नेहरूकाका फार आवडत. नेहरूकाकांकडे जाताना मुले त्यांना भेट म्हणून फुले आणीत.

निरनिराळ्या देशांतल्या मुलांसाठी नेहरूकाका भेटी पाठवीत असत. त्यांनी पाठविलेली भेट मुलांना फार आवडत असे.

मुलांना शाळेच्या मधल्या सुटीत जेवण देण्याची सोय सरकारने करावी असे त्यांना वाटत असे.

त्यांचा स्वभाव फार मायाळू होता. केव्हा केव्हा ते आपल्या मदतनिसावर चिडत, त्याच्याशी भांडत. पण थोड्या वेळाने ते सगळे विसरून जात.

त्यांचे आपल्या घरच्या मंडळींवर फार प्रेम होते. त्यांना दोन लहान बहिणी आहेत.

एक विजयालक्ष्मी पंडित आणि दुसरी कृष्णा हाथीसिंग. नेहरूकाकांना एकच मुलगी आहे. तिचे नाव इंदिरा.

इंदिरा गांधी हे नाव तुम्ही ऐकले असेल. त्या इंदिरा गांधी म्हणजेच नेहरूकाकांची इंदिरा.



…थांब हं देतो

… किती गोड घास हा

मुलांनो, आपणा सर्वांवरः एवढेच नव्हे तर जगातील सर्व लोकांवर प्रेम करणारे नेहरूकाका आता आपल्यात नाहीत !

१९६४ सालच्या मे महिन्याच्या २७ तारखेला दुपारी ते हे जग सोडून गेले.

त्यांच्या मृत्यूची बातमी ऐकून जगातले सगळे लोक दुःखी झाले.

त्यांच्यासाठी मोठमोठ्या डॉक्टरांनी खूप प्रयत्न केले; पण काळाच्या पुढे कोणाचे काही चालत नाही. नेहरू-काकांचे भगवान गौतम बुद्धावर फार प्रेम होते.

भगवान बुद्धाच्या सांगण्याप्रमाणे सर्वांनी वागावे असे ते सगळयांना सांगत असत.

नेहरूकाकांची आठवण म्हणून आपण त्यांच्या सांगण्याप्रमाणे सतत काम करून शांततेने रहावयाचा प्रयत्न केला पाहिजे.

मग मुलांनो, कराल ना तुम्ही सतत काम करण्याचा निश्चय !

जय हिंद !

विभाग.
BVBK-0400546